<table>
<tr><td rowspan="2">MHKO050005942022</td><td rowspan="2">संक्षिप्त फौजदारी खटला क्र.<br>७८८/२०२३<br>नि.६ लगत</td><td>दाखल तारीख</td><td colspan="3">१३/०४/२०२३</td></tr>
<tr><td>नोंदणी तारीख</td><td colspan="3">१३/०४/२०२३</td></tr>
<tr><td rowspan="3"></td><td rowspan="3">महाराष्ट्र सरकार<br>वि.<br>दिपक नंदे</td><td>निकाल तारीख</td><td colspan="3">०२/०७/२०२६</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td>वर्ष</td><td>महिने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>०३</td><td>०२</td><td>१९</td></tr>
</table>

## :- न्यायनिर्णय -:-
## (अधिघोषीत दि.०२/०७/२०२६)

१. सरकारपक्षाने आरोपीच्या विरुध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) च्या गुन्हयासाठी प्रकरण चालविले आहे.

२. प्रस्तुत प्रकरणाचे कामी आरोपीचे विरुध्द मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये प्रतिकथन नोंदविले. आरोपीने सदरचे प्रतिकथन त्यांना मान्य नसल्याचे कथन करुन संपरिक्षा घेण्याची विनंती केली.

३. सरकार पक्षातर्फे विधीज्ञ श्री.ए. ए. गोपलकर व आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. मांडरे यांचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे प्रस्थापित केलेले आहेत. सदरचे मुद्दे, कारणमिमांसा व निष्कर्षासह खालीलप्रमाणे

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.२७/०७/२०२२ रोजी २०.०० वाजताचे सुमारास पत्र्याच्या शेडमध्ये, हनुमाननगर गल्ली नं.१, इचलकरंजी येथे आरोपी बिगरपरवाना, बेकायदा गावठी हातभट्टी दारूची विक्री करताना मिळून आला व त्यायोगे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला ? | ..नाही. |
| २. | अंतिम आदेश | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र.१ व २ बाबतः–</u>**

४. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी सा.क्र.१ सर्जेराव तुकाराम कळंत्रे यांची साक्ष नि.६ लगत नोंदविली आहे. अभियोगपक्षाने इतर साक्षीदारांचा पुरावा नोंदविला नाही. रासायनिक अहवाल अभिलेखावर नाही. म्हणून नि.क्र.१कडे आदेश पारीत करून अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. आरोपीविरूध्द कोणताही सबळपुरावा अभिलेखावर आला नसल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदविणेत आले नाही.

५. सरकारपक्षाचे साक्षीदार क्रमांक १ सर्जेराव तुकाराम कळंत्रे यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, दिनांक २७/०७/२०२२ रोजी पोलिसांनी कोठेही बोलाविले नव्हते. त्यांच्या समक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार करण्यात आला नव्हता. त्यांनी केवळ पंचनाम्यावरील त्यांची सही ओळखली व मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. सदर साक्षीदार अभियोगपक्षास मदत करत नसल्यामुळे त्याला उलटतपासामध्ये सुचक प्रश्न विचारण्यात आले परंतू त्यामधुनही कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे सदरील साक्षीदाराची साक्ष ही आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता उपयुक्त नाही.

६. सदर कामी अभियोगपक्षाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष नोंदवलेली नाही. जप्ती पंचनामेवरील पंच साक्षीदार अभियोगपक्षास मदत करत नसल्याने जप्ती पंचनामा हा सिध्द झालेला नाही. तसेच आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त केला व तो मुद्देमाल दारु होता, ही बाब सिध्द होत नाही. घटनास्थळी हजर असलेल्या किंवा दुसऱ्या एकाही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदविणेत आलेली नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यातून जप्त केला ही बाब शाबित होत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील मुद्देमाल जप्ती पंचनामा शाबित झालेला नाही.

७. प्रस्तुत प्रकरणामध्ये सरकारपक्षामार्फत रासायनिक विश्लेषक यांच्याकडील अहवाल प्रस्तुत कामात दाखल केलेला नाही. त्यामुळे जप्त केलेला मुद्देमाल हा दारु होता ही बाब पुराव्यानिशी सिध्द झालेली नाही.

८. प्रस्तुत प्रकरणातील दोषारोप पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर कामी जप्त केलेली अंदाजे २० लि. हातभट्टीची दारू हा मुद्देमाल अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर येथे पुढील निर्गती करीता देण्यात यावा.

९. सबब अभियोगपक्षाचे पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला मुद्देमाल दारुच होती ही बाब निर्विवादपणे व विनाशंका एकमेकांस पूरक अशा पुराव्यान्वये सिध्द झाली नाही. सबब मुद्दा क्रमांक १ ला मी नकारार्थी उत्तर देतो व मुद्दा क्रमांक २ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. आरोपी यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) नुसार मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) खालील गुन्हयामधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. जप्त मुद्देमाल अंदाजे २० लिटर गावठी हातभट्टीची दारू ही अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर येथे पुढील निर्गती करीता देण्यात याव्यात.

३. आरोपी यांचे वैयक्तीक जातमुचलके रद्द करण्यात येतात.

४. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ ची पूर्तता म्हणुन वैयक्तिक जातमुचलका रुपये ५,०००/– द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्धोषित)

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.07.02 15:38:13 +0530

**इचलकरंजी**
**दिनांकः ०२/०७/२०२६**

**(डी. बी. साठे)**
**न्यायदंडाधिकारी वर्ग–१, न्यायालय क्र.२**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर.**